# श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय,मालेगांव कॅम्प नासिक
## राष्ट्रीय सेवा योजना
## विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल
## सक्षम युवा समर्थ भारत
### दि.१८/१२/२०१८ ते २४/१२/२०१८

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षातील राष्ट्री सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर मौजे दाभाडी, रोकडोबा नगर या गावी घेण्यात आले . सदर दाभाडी, रोकडोबा नगर हे गावठाण जमीनीवर वसलेले कष्टकरी, असंघटीत, कारागीर,कामगार वस्तीचे गांव आहे. हि वस्ती ६० % भटक्या जमाती (एस.टी.) ४० % अनुसूचीत जाती व ओ.बी.सी / एन.टी.या संवर्गातील समुहाने बनलेले आहे.महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय, आर्ट, सायन्स कॅालेज रावळगांव व आर्ट व कॉमर्स कालेज,दाभाडी हे तीन महाविद्यालय एकत्र येऊन रा.से.यो.शिबीराचे आयोजन रोकडोबा नगर येथे करण्यात आले होते. शिबीराचे उद्दीष्टे सक्षम युवा समर्थ भारत या उपक्रमाणे घेण्यात आले.राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय व उद्दीष्टे प्रमाणे पुढील सात दिवशीय श्रम व ज्ञान संस्कार कार्यक्रम घेण्यात आले.

१) दि. १८/१२/२०१८ रोजी दाभाडी रोकडोबा नगर येथील श्री क्षेत्र हनुमान मंदीर परिसरात शिबीराचे उदघाटन मा.डॉ. अव्दव (आबा) हिरे (पाटील) चेअरमन नाशिक जिल्हा औदयोगिक संघ व समन्वयक महात्मा गांधी विद्यामंदीर नाशिक, यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणुन मा. डॉ.प्रशांत सुर्यवंशी संचालक कर्मवीर भाऊसाहेब हिरे व्यवस्थापन महाविद्याय,मालेगांव)यांनी प्रभावशाली व स्वयंशिस्त राष्ट्राची निर्मीती करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेची भुमिका महत्वाची असते. समाज सेवा हीच ईश्वर सेवा असुन असामाजिक ,अनैतिक वर्तनांचे मुळ अनेक गोष्टी असु शकतात, विद्यार्थीनीनी शिक्षण घेत असतांना चांगल्या गोष्टींचा स्विकार करावा. असे मत मा.सावकार यांनी प्रकट केले . या कार्यक्रमाच्या अध्यक्षा मा.प्राचार्य डॉ.उज्वला देवरे होत्या. या कार्यक्रम प्रसंगी श्रमदानातुन शारीरिक व मानसिक स्वास्थ चांगले राहते. स्ववंलंबनाचा महत्वाचा धडा रासेयो शिबीरातुन मिळतो. बदलेल्या काळानुसार व्यावरिकता ग्रामीण माणसानमध्ये रूजवणे आवश्यक आहे. असे मत महाविद्यालयाच्या प्राचार्यानी व्यक्त केले. या कार्याक्रमासाठी, मा.सरपंच सौ.चारूशिला निकम, उपसरपंच सौ.निलीमा बाविस्कर, ग्रामविकास अधिकारी मा.दिलीप रामसिंग निकम व ग्रामपंचायत सदस्य शुभाष नहिरे, महाविद्यालयाच्या कार्यक्रम अधिकारी दिलीप पवार,सहकार्यक्रम अधिकारी श्रीमती.दिपांजली बोरसे व डॉ.राजश्री सावंत उपस्थित होते. दुपारच्या सत्रात प्रा.डॉ.मिना पाटील मॅडम व प्रा.डॉ.एस.डी.खैरनार यांनी ग्राम स्वच्छता व महिलांचे प्रश्न व आरोग्य या विषयावर प्रबोधन केले.

२) दि.१९/१२/२०१८ रोजी सकाळी ग्रामस्वच्छता फेरी काढण्यात आली व गांवाचा परिसर स्वच्छ करण्यात आला दुपारच्या सत्रात मा.श्री.विनोद पगार (धुळे) यांचे महात्मा गांधी व आजचे प्रश्न व प्रा.डॉ.एस.बी.सानप यांनी स्वच्छ भारत व युवती.या विषयावर प्रबोधन केले.

३) दि. २०/१२/२०१८ रोजी श्रीक्षेत्र हनुमान मंदीर येथे परिसर स्वच्छता अभियान राबवुन रोकडोबा नगर येथे आधार कार्ड सर्व्हे व जनजागृती करण्यात आली. दुपारच्या सत्रात प्रा.डॉ. विकास गायकवाड यांनी पाणी फाऊन्डेशन व जलयुक्त शिवार व प्रा.एल.एन.सोनवणे यांनी स्वामी विवेकानंदाचे विचार या विषयावर प्रबोधन केले

४) दि. २१/१२/२०१८ रोजी श्रीक्षेत्र रोकडोबा मंदिर परीसरातील जुन्या तलावाचे गाळ काढुन खोली करण्यात आली व पाणी पुर्नरजीवनासाठी प्रयत्न करण्यात आले व सलग सम पातळीचर तयार करण्यात आली. दुपारच्या सत्रात श्रीमती.शोभाताई करांडे (पुणे) यांनी महिला सक्षमीकरण व व श्रीमती.विद्या सुर्वे यांनी स्त्रीयांचे लेखन या विषयावर व्याख्यान दिले.

५) दि. २२/१५/२०१८ रोजी सकाळी मालेगांव व सकाळी पाणी अडवा पाणी जीरवा जलशिवार योजना,जलसंवर्धन या योजनावर पथनाट्य घेण्यात आले. व रॅली काढुन जनजागृती करण्यात आली. दुपार सत्रात डॉ.नरेंद्र देशमुख व्यक्ति महत्व विकास या विषयावर व मा.दिपक गुप्ता यांनी शासकिय योजनांचे मार्गदर्शन या विषयावर व्याख्यान दिले

६) दि. २३/१२/२०१८ रोजी अवयव दान सर्व श्रेष्ठ दान याविषयी जनजागृती रॅली काढण्यात आली. व गाव हगणदारी मुक्त व्हावे म्हणुन गावात सर्व्हे करण्यात आला. दुपार सत्रात प्रा.सलीम पिंजारी यांनी स्थानिक इतिहास लेखन व प्रा.जे.डि.पगार यांनी शाश्वत ग्राम व गांधी विचार या विषयावर प्रबोधन व्याख्यान झाले.

७) दि. २४/१२/२०१८ रोजी आपत्ती व्यवस्थापन या विषयावर मा.संजय डी.पवार यांचे व्याख्यान झाले व प्रात्यक्षिक करून जनजागृती करण्यात आली. तसेच स्वच्छता अभियान, मतदान जागृती, बेटी बचाव बेटी पढाव, व्यसन मुक्ती,पाटी अडवा पाणी जीरवा,माती पाणी परिक्षण या विषयी गावात पथनाट्य सादर करण्यात आले. श्रम संस्कार शिबीराचा समारोह दुपारी करण्यात आला. शिबराच्या समारोप साठी मा. श्री.बी.के.देवरे (उपाध्यक्ष –महात्मा गांधी विद्यामंदीर मालेगांव कॅम्प) व महाविद्यालयाच्या प्राचार्या उज्वला देवरे मॅडम मा.महंत नागा गरीबदास महाराज तसेच मा.संजय पवार(प्रमुख अग्नी शामक दल मालेगांव) सरपंच,उपसरपंच,ग्राम सेवक ग्रामस्थ तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते. या सर्व मान्यवर व रासेयो च्या स्वंयम सेविकांनी मंदीर परिसरात २२ वृंक्षांची लागवड केली. या सात दिवसीय शिबीरास एन.एस.एस. विद्यार्थीनी प्रतिनीधी संजना पवार हिने सुत्र संचालन केले गावातील जनतेशी सुसंवाद सादला या शिबीरामुळे राष्ट्रीय उभारणी व ग्रामस्वच्छता ,जन-जागरणात मोलांचा हातभार लावला. प्राचार्य डॉ.सौ.उज्वला देवरे,डॉ.भारती खैरनार कार्यक्रम अधिकारी प्रा.दिलीप पवार, डॉ.राजश्री सावंत व श्रीमती.दिपांजली बोरसे यांनी शिबीर यशस्वी केले.

कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना
श्रीमती पुष्पाताई हिरे महिला कॉलेज
मालेगाव कॅम्प (नाशिक)

प्राचार्य
एस.पी.एच. महिला महाविद्यालय
मालेगांव कॅम्प ४२३ १०५ (नाशिक)



रा.से.यो.उदघाटन कार्यक्रम पसंगी मार्गदर्शन मा.डॉ.प्रशांत सुर्यवंशी





जलसंवर्धनावर पथनाट्य व श्रमदान करतांना रा.से.यो.स्वयंम सेविका





## मालेगाव : महिला महाविद्यालय, दाभाडी व रावळगाव महाविद्यालयातर्फे आयोजन

# रोकडोबानगर येथे रासेया श्रमशिबिराचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

मालेगाव : येथील श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय, रावळगाव येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि दाभाडी येथील बी. एम. पाटील कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रोकडोबानगर येथे झालेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार सक्षम युवा समर्थ भारत शिबिराचे उद्घाटन डॉ. प्रशांत सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे म्हणून दाभाडीचे उपसरपंच नीलिमा वाघिस्कर होत्या. अध्यक्षस्थानी रावळगाव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण येवले होते. महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उज्ज्वला देवरे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास रोकडोबा मंदिराचे महंत नागा गरीबदास महाराज उपस्थित होते. २४ डिसेंबरपर्यंत सुरू असलेल्या या शिबिरात वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन, माती परिक्षण, ग्रामस्वच्छता, जलयुक्त शिवार आदी उपक्रम राबविले जात आहे. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डी. ए. पवार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. राजश्री सावंत यांनी केले, तर प्रा. दीपांजली बोरसे यांनी आभार मानले. रासेयो स्वयंसेवक, स्वयंसेविका, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मालेगाव तालुक्यातील रोकडोबानगर येथे रासेयो श्रम शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. प्रशांत सूर्यवंशी, प्रा. डॉ. येवले, दाभाडीच्या उपसरपंच नीलिमा वाघिस्कर, कार्यक्रम अधिकारी पवार आदी.

◆ श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय, रावळगाव येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि दाभाडी येथील बी. एम. पाटील कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रोकडोबानगर येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिरात वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन, माती परिक्षण, ग्रामस्वच्छता, जलयुक्त शिवार आदी उपक्रम राबविले जात आहे.

पुण्य नगरी
नाशिक – कसमादेनां मंगळवार, ३१ जुलै २०१८

# महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे वृक्षदिंडी



**मालेगाव** - महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले.

जागतिक तापमान वाढ, हवामान आणि ऋतु बदल याची दाहकता आणि तीव्रता कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्याचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला असून त्याचे महत्व समाजातील सर्वस्तरावर पोहचवावे या हेतुने या वृक्षदिंडीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. वृक्षदिंडीत वृक्ष लागवडीसाठी वेगवेगळे फलक याबरोबरच घोषणांचा वापर स्वयंसेविकांनी केला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ. उज्ज्वला देवरे, कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप पवार, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. राजश्री सावंत, विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी योगिता पाटील यांनी सहभाग घेतला. सदर वृक्षदिंडीत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविका दर्शन कुऱ्हे, शुभांगी खैरनार, नेहा देसाई, तेजस्वीनी पाटील, निलीमा आहिरे, सुजाता पवार, कल्याणी पवार, रत्नमाला चौधरी, सायली नहिरे, प्रगती चौधरी या विद्यार्थिनींनी विशेष परिश्रम घेतले. वृक्षदिंडी संपल्यानंतर वृक्ष लागवडीचे महत्व व त्यातून होणारे फायदे याविषयी प्रा. दिलीप पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सदर उपक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. राजश्री सावंत, डॉ. रमेश निकम यांनी विशेष परिश्रम घेतले.

सकाळ ** बुधवार, २९ ऑगस्ट २०१८

# तरुणींनी ध्येयाकडे लक्ष द्यावे

## उपअधीक्षक रत्नाकर नवले यांचे प्रतिपादन; राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

मालेगाव, ता. २८ : तरुणींनी ध्येयाकडे, शिक्षण व उज्ज्वल भविष्याकडे लक्ष दिले पाहिजे. सोशल मीडियापासून विद्यार्थिनींनी सावध राहणे आवश्यक आहे. पोलिस सेवेत असल्याने तरुण मुला-मुलींच्या प्रेमसंबंधांमुळे भविष्यातील आयुष्य अंधारात गेल्याची अनेक उदाहरणे आपण पाहिली आहेत, असे मत पोलिस उपअधीक्षक रत्नाकर नवले यांनी मंगळवारी येथे व्यक्त केले.



**मालेगाव : 'रासेयो'च्या उद्घाटनप्रसंगी मंगळवारी बोलताना पोलिस उपअधीक्षक रत्नाकर नवले. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. सुभाष निकम, दिलीप पवार आदी.**

पीव्हीएच महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी दिलीप पवार यांनी प्रास्ताविकात सेवा योजनेची माहिती दिली. प्राचार्य निकम यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतून व्यक्तिमत्त्व विकास व विधायक कार्याला चालना मिळते. फळाची अपेक्षा न करता समाजहितासाठी काम करणे हा योजनेचा हेतू आहे. मूल्यांपासून दूर जाणाऱ्या तरुण पिढीसाठी हा प्रबोधनात्मक उपक्रम आहे. या वेळी सोमनाथ सानप, बी. डी. पगार, आर. जी. शेवाळे आदी उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्नेहा देसाई, निकिता पवार, शीतल शिंदे, निकिता कदम, रूपाली चव्हाण आदी स्वयंसेविकांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. दीपांजली बोरसे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. राजश्री सावंत यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.